# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.०४.१०.२०२३.

**आलोसे मनोज जगन्नाथ भोजापुरे वय ५५ वर्षे, व्यवसाय नोकरी-कनिष्ठ सहायक,एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प कार्यालय,पंचायत समिती मानोरा,जि.प.वाशिम,रा.दापुरा खु ता.मानोरा जि.वाशिम यांना ३५,०००/- रुपयेची लाच स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत.**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | १)आलोसे मनोज जगन्नाथ भोजापुरे वय ५५ वर्षे, व्यवसाय नोकरी-कनिष्ठ सहायक,एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प कार्यालय,पंचायत समिती मानोरा,जि.प.वाशिम,रा.दापुरा खु ता.मानोरा जि.वाशिम<br>२) संतोष आत्माराम वानखेडे वय ३७ वर्षे व्यवसाय मजुरी रा.गिराट ता. मानोरा जि.वाशिम (खाजगी इसम) |
| लाचेची रक्कम | ३५,०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे पत्नीची ग्राम भिलडोगंर येथील अंगणवाडी मदतनिस या पदाकरीता निवड करुन देण्याकरीता |
| सापळा अधिकारी | बालाजी आर तिप्पलवाड,<br>पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

दि.०३.१०.२०२३ रोजी यातील तक्रारदार पुरुष वय २६ वर्ष व्यवसाय शेतीकाम यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे पत्नीची ग्राम भिलडोगंर येथील अंगणवाडी मदतनिस या पदाकरीता निवड करुन देण्याकरीता आरोपी लोकसेवक मनोज जगन्नाथ भोजापुरे कनिष्ठ सहायक यांनी तक्रारदारास ५०,०००/-रुपये लाचेची मागणी केली आहे. सदर तक्रारीवरुन पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे यांनी तडजोडीअंती ३५,०००/-रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच आरोपी क्र.२ संतोष आत्माराम वानखेडे याने तक्रारदारास लाच देण्यास प्रोत्साहीत केल्याचे निष्पन्न झाले.

दि.०४.१०.२०२३ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदाराकडुन ३५,०००/- रु. लाचेची रक्कम ज्यामध्ये २०,०००/-रुपये च्या चलनी नोटा तसेच १५,०००/-रु च्या पांढरे कागद ५००/-रु च्या नोटांचे आकाराचे स्विकारल्याने, आलोसे यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन लाचेची रक्कम ३५,०००/-रु. (२०,०००/-रुपये च्या चलनी नोटा तसेच १५,०००/-रु च्या पांढरे कागद ५००/-रु नोटांचे आकाराचे) स्विकारल्याने जप्त करण्यात आली. लोकसेवक यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.आरोपी क्र.२ संतोष आत्माराम वानखेडे हा फरार आहे.

सदर कारवाई मा.पोलीस अधीक्षक,श्री.मारोती जगताप, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री.देविदास घेवारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती पोलीस उप अधीक्षक, श्री.गजानन आर.शेळके, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक बालाजी आर तिप्पलवाड,पोलीस निरीक्षक एस.यु.कांबळे अंमलदार पोहेकॉ नितील टवलारकर, आसिफ शेख,विनोद अवगळे,योगेश खोटे,राहुल व्यवहारे,पो.ना.रविंद्र घरत,समाधान मोघाड व चापोकॉ नाविद शेख यांनी केली.

कोणत्याही लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकीय कामासाठी लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम, दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३, टोल फ्रि.नं.१०६४ यावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस उपअधिक्षक कार्यालय ... वाशिम

Balaji
(बालाजी आर.तिप्पलवाड)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.